दैनिक
महाराष्ट्राच्या परिवर्तनवादी विचारांचे ऐकमेव निर्भिड दैनिक
# वादळ वार्ता
vadalvartanews@gmail.com
संपादक : अजय भांगे
https://epaper.vadalvarta.com
बीड (महाराष्ट्र) दैनिक मराठी • बुधवार दि.१८ फेब्रुवारी २०२६ • 9422660077 • आरएनआय-एमएएचएमएआर/२०२३/८७५५५ • वर्ष ३ रे • अंक १७४ • पाने ४ • किंमत ४ रुपये
Beed (Mahmar) Daily Marathi • Wednesday 18 Feburary 2026 • 9422660077 • RNI-MAHMAR / 2023 / 87555 • Year - 3rd • Issue 174 • Pages 4 • Rate 4 Rs

### उपसचिव मिलिंद शेणॉय यांची उचलबांगडी

**मुंबई**–राज्यातील शिक्षण संस्थांना अल्पसंख्यांक दर्जा देण्याची प्रक्रिया गेल्या वर्षी ऑगस्ट महिन्यापासून स्थगित करण्यात आली होती. मात्र, संबंधित खात्याची जबाबदारी सांभाळणारे राज्याचे माजी उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्या अपघाती निधनानंतर अवघ्या काही तासांत मंत्रालयातून ७५ शिक्षण संस्थांना अल्पसंख्यांक दर्जा देण्यात आल्याची माहिती समोर आली आणि एकच खळबळ उडाली होती. यावर राज्यभरातून तीव्र संताप व्यक्त केला गेला. आता या प्रकरणी मोठी कारवाई करत अल्पसंख्यांक विभागाचे उपसचिव मिलिंद शेणॉय यांचीह बदली करण्यात आली आहे.अजित पवारांचे २८ जानेवारी रोजी सकाळी विमान अपघातात निधन झाले. या घटनेमुळे संपूर्ण राज्यभरात शोक व्यक्त केला जात असतानाकज दुसरीकडे मात्र याच दिसवही दुपारी ३ वाजता मंत्रालयात अल्पसंख्यांक विभागामार्फत प्रमाणपत्रे वाटली गेली. तसेच मंत्रालयातून अल्पसंख्यांक दर्जा देण्यात येणारे पहिले प्रमाणपत्र देखील जारी करण्यात आले.

# राज्य सरकारने थकीत शेतकरी कर्जदारांचा डेटा मागवला

## आगामी अर्थसंकल्पात कर्जमाफीबाबत मोठी घोषणा शक्य

**राज्यातील शेतकऱ्यांच्या कर्जमाफीच्या प्रश्नावर राज्य सरकारने महत्त्वाची पावले उचलण्यास सुरुवात केली आहे. राज्य सरकारकडून राज्यातील सर्व बँकांना थकीत कर्जदार शेतकऱ्यांची सविस्तर माहिती शासनाच्या शिंदे समितीकडे पाठवण्याच्या सूचना देण्यात आल्या आहेत. त्यामुळे आगामी अर्थसंकल्पीय अधिवेशनात शेतकऱ्यांसाठी काही सकारात्मक घोषणा होऊ शकतात, अशी चर्चा रंगू लागली आहे. विशेषतः थकीत कर्ज असलेल्या शेतकऱ्यांमध्ये या हालचालींमुळे आशेचे वातावरण निर्माण झाले आहे.जून २०२५ पर्यंत थकबाकी असलेल्या शेतकऱ्यांची माहिती गोळा करण्याचे काम विविध जिल्हा बँकांमार्फत सुरू आहे. नाशिक जिल्हा बँकेनेही या प्रक्रियेत पुढाकार घेतला असून सुमारे ७४ हजार शेतकऱ्यांची माहिती राज्य सरकारच्या अधिकृत पोर्टलवर अपलोड करण्यात आली आहे. उर्वरित शेतकऱ्यांची माहिती गोळा करण्याची प्रक्रिया अद्याप सुरू आहे. यामुळे संपूर्ण राज्यातील थकीत कर्जदारांचा अचूक आकडा शासनासमोर येणार आहे.**

दैनिक वादळ वार्ता
**मुंबई । प्रतिनिधी**

नाशिक जिल्हा बँकेचे मुख्य कार्यकारी अधिकारी अरविंद शिंदे यांनी यासंदर्भात माहिती देताना सांगितले की, राज्य शासनाच्या मदतीसाठी एक समिती गठीत करण्यात आली आहे. या समितीकडून ३० जून २०२५ ते ३० सप्टेंबर २०२५ या कालावधीतील थकबाकीदार शेतकऱ्यांची माहिती मागवण्यात आली आहे. जिल्ह्यातील सेवा सहकारी सोसायट्या, त्यांचे सचिव, बँकेचे तपास अधिकारी आणि शाखाधिकारी यांच्या माध्यमातून माहिती संकलन सुरू आहे. तसेच सहनिबंधक आणि निबंधक कार्यालयातील अधिकाऱ्यांचेही सहकार्य मिळत असल्याचे त्यांनी सांगितले.या संपूर्ण प्रक्रियेचा उद्देश म्हणजे राज्यातील खऱ्या अर्थाने थकीत असलेल्या शेतकऱ्यांची स्पष्ट यादी तयार करणे हा आहे. शासनाच्या पोर्टलवर माहिती अपलोड झाल्यानंतर पुढील निर्णय घेणे सोपे जाणार आहे. कर्जमाफीचा निर्णय घ्यायचा झाल्यास अचूक



आकडेवारी महत्त्वाची ठरणार असल्याचे प्रशासनातील सूत्रांचे म्हणणे आहे. त्यामुळे बँकांकडून माहिती संकलन आणि पडताळणी या दोन्ही गोष्टींना प्राधान्य दिले जात आहे.दरम्यान, राज्याचे अर्थसंकल्पीय अधिवेशन २३ फेब्रुवारी २०२६ पासून सुरू होणार आहे. हे अधिवेशन २५ मार्च २०२६ पर्यंत चालणार असून ६ मार्च रोजी राज्याचा अर्थसंकल्प सादर केला जाणार आहे. राज्याच्या विधिमंडळाचे हे महत्त्वाचे अधिवेशन मुंबईत पार पडणार आहे. अधिवेशनाच्या पार्श्वभूमीवर कर्जमाफीचा विषय अधिकच चर्चेत आला आहे. शेतकरी वर्गाचे लक्ष आता अर्थसंकल्पाकडे लागले आहे.यंदाच्या अधिवेशनात एक वेगळी बाब घडणार आहे. राज्याचे उपमुख्यमंत्री आणि अर्थमंत्री अजित पवार यांच्या अकाली निधनामुळे यावेळी अर्थसंकल्प सादर करण्याची जबाबदारी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्यावर असणार आहे. विधानपरिषदेचे सभापती राम शिंदे आणि विधानसभा अध्यक्ष राहुल नार्वेकर यांच्या अध्यक्षतेखाली कामकाज सल्लागार समितीची बैठक पार पडली. या बैठकीत अधिवेशनाची रूपरेषा निश्चित करण्यात आली. पहिल्याच दिवशी दोन्ही सभागृहांमध्ये शोक प्रस्ताव मांडण्याचा निर्णयही घेण्यात आला आहे.

### शेतकऱ्यांमध्ये अपेक्षा वाढल्या


**एकूणच, कर्जमाफीच्या दृष्टीने सरकारकडून सुरू असलेली माहिती संकलनाची मोहीम आणि आगामी अर्थसंकल्पीय अधिवेशन यामुळे शेतकऱ्यांमध्ये अपेक्षा वाढल्या आहेत. ७४ हजार शेतकऱ्यांची माहिती आधीच पोर्टलवर अपलोड झाली असून उर्वरित माहिती लवकरच पूर्ण होणार असल्याचे संकेत आहेत. या पार्श्वभूमीवर ६ मार्च रोजी सादर होणाऱ्या अर्थसंकल्पात शेतकऱ्यांसाठी कोणती गोड बातमी जाहीर होते, याकडे संपूर्ण राज्याचे लक्ष लागले आहे.**

### आसावरी जगदाळे यांना शासकीय सेवेत सामावून घेण्याचा निर्णय

## डॉ.नीलम गोऱ्हे यांनी उपमुख्यमंत्री शिंदे यांच्या निर्णयाचे मानले आभार

दैनिक वादळ वार्ता
**मुंबई । प्रतिनिधी**

अरविंद बनसोडे कुरनूरकर:आज पहलगाम येथील दहशतवादी हल्ल्यात मृत्युमुखी पडलेले पुण्यातील संतोष जगदाळे यांची मुलगी आसावरी जगदाळे हिला आज या शासकीय सेवेत सामावून घेण्याचे निर्देश उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी दिल्यानंतर विधान परिषद उपसभापती डॉ. नीलम गोऱ्हे यांनी या निर्णयाचे स्वागत करत आभार व्यक्त केले आहेत.डॉ. गोऱ्हे यांनी म्हटले की, दहशतवादी हल्ल्यात कुटुंबप्रमुख गमावलेल्या कुटुंबाला शासनाकडून मिळणारा हा दिलासा अत्यंत महत्त्वाचा



असून उपमुख्यमंत्री शिंदे यांनी अनेक प्रशासकीय अडचणींवर मात करून हा निर्णय तडीस नेला आहे. अशा संवेदनशील आणि सहानुभूतीपूर्ण भूमिकेमुळे पीडित कुटुंबाला आधार मिळणार असल्याचे त्यांनी नमूद केले.उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी पुणे महानगरपालिका आयुक्त नवलकिशोर राम यांच्याशी दूरध्वनीवरून संवाद साधून आसावरीच्या शिक्षणाला समकक्ष असे पद निर्माण करून तिला सेवेत सामावून घेण्याचे निर्देश दिले आहेत. शासन विशेष बाब म्हणून सहानुभूतीपूर्वक या नियुक्तीला मंजुरी देईल, असेही त्यांनी स्पष्ट केले.लवकरच आसावरी जगदाळे हिला शासकीय सेवेत सामावून घेण्याची प्रक्रिया पूर्ण होणार असून या निर्णयामुळे जगदाळे कुटुंबाला मोठा दिलासा मिळणार आहे, असे डॉ. गोऱ्हे यांनी सांगितले.

## कर्जमाफीची अंमलबजावणी न झाल्यास सरकारची अडचण वाढेल-आ.सत्तार

दैनिक वादळ वार्ता
**छत्रपती संभाजीनगर । प्रतिनिधी**

आगामी अर्थसंकल्पीय अधिवेशनात राज्य शासनाला कर्जमाफीच्या वचननाम्याची आठवण करून देणार असून, दिलेल्या वचनाची अंमलबजावणी झाली नाही तर अडचणी निर्माण होतील, अशी नाराजी आमदार अब्दुल सत्तार यांनी व्यक्त केली. सिल्लोड येथे नवनिर्वाचित जिल्हा परिषद, पंचायत समिती सदस्यांचा सत्कार सोहळा रविवारी (दि. १५) झाला. यावेळी ते बोलत होते. तालुक्यातून शिवसेना शिंदे गट पक्षाच्या वतीने सहा जि.प.सदस्यांसह ८ पंचायत समिती सदस्यांचा सत्कार करण्यात आला. २३ फेब्रुवारीपासून राज्याचे अर्थसंकल्पीय अधिवेशन सुरू होणार आहे. या अधिवेशनात तालुक्यातील जनतेचे प्रश्न



मांडणार असल्याचे आमदार सत्तार यांनी सांगितले. विजयी उमेदवारांच्या जबाबदाऱ्या वाढल्या. त्यांनी मतदारांच्या संपर्कात राहण्याचे आवाहन केले. आम्ही तालुक्यात सर्व समाजाला उमेदवारी दिली, तर विरोधकांनी जातीयवाद केला. त्यामुळे मतदारांनी दोन्ही बाजूंचा विचार करावा, असेही आवाहन आ. सत्तार यांनी केले. याप्रसंगी तालुकाप्रमुख केशवराव तायडे, विनोद मंडलेचा, मुक्ताराम गव्हाणे, अंबादास सपकाळ, दामूअण्णा गव्हाणे, मंगल तायडे, निकिता काळे, अब्दुल आमेर, सुदर्शन अग्रवाल, प्रभाकर पारधे आदी उपस्थित होते.आगामी चार महिन्यांत सूतगिरणी सुरू करण्यात येईल. या सूत गिरणीतून एक वर्षात कापड निर्मिती होईल. एमआयडीसीसाठी ठिकाण बदलले जाणार असून, त्यामुळे तालुक्याच्या विकासात मोठी भर पडणार असल्याचे सत्तार यांनी सांगितले. तसेच एकेकाळी शिवसेना जहालवादी पार्टी होती, परंतु आता उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी सर्व जाती धर्मांच्या लोकांना सोबत घेतल्याने शिवसेना पक्ष मोठा झाला आहे, असे सत्तारांनी सांगितले.

## संरक्षित क्षेत्रातील वाघांचे खाणे बदलले मानवी वस्तीतील 'या' प्राण्यांची शिकार अधिक

दैनिक वादळ वार्ता
**मुंबई । प्रतिनिधी**

आज मानवी वस्त्यांच्या जवळ असणाऱ्या संरक्षित क्षेत्रातील वाघांच्या आहार पद्धतीत बदल झालेअसल्याचे पुढे आले आहे. वाघांच्या आहार पद्धतीत बदल झाल्यासारखे त्याचे थेट परिणाम पर्यावरणावर होण्याबरोबरच संरक्षित क्षेत्राजवळील मानवी वस्त्यांवरही होतो. त्यामुळे हा अभ्यास महत्वाचा मनाला जात आहे. राजस्थानातील रणथंबोर येथील व्याघ्र प्रकल्प प्रसिद्ध आहे. येथील वाघांच्या आहार पद्धतीचा अभ्यास करण्यासाठी नुकताच
नॅशनल सेंटर फॉर बायॉलॉजिकल सायन्सेसकडून ( एनसीबीएस ) संशोधन करण्यात आले. यात वाघांच्या विष्ठेचा तुलनातम्क अभ्यास पारंपरिक पद्धत आणि नव्या डीएनए मेटाबारकोडिंग चाचणीद्वारे करण्यात आला. याच अभ्यासातून वाघ कोणत्या प्राण्यांची शिकार अधिक करतो ही माहिती देखील उपलब्ध झाली आहे.

**कुठल्या प्राण्याची शिकार अधिक ?**

वाघांच्या अधिवास क्षेत्रात असणाऱ्या प्राण्यांपैकी मुखतः चितळ आणि सांबर या वन्यप्राण्यांची शिकार वाघाकडून अधिक केली जाते. त्याचबरोबर वाघांच्या आहारात नीलगाय, रानडुक्कर आणि चिंकाराचाही समावेश असतो. मात्र, नुकताच करण्यात आलेल्या संशोधनातून शेतकऱ्यांची पाळीव जनावरे हे वाघांचे लक्ष्य ठरत आहे. यामुळे मानवी वस्त्यांमध्ये असणारे पाळीव प्राणी आता वाघांच्या आहाराचा भाग होत आहेत, अशी धक्कादायक बाब समोर आली आहे.
तीन-चतुर्थांशपेक्षा अधिक विष्ठांच्या नमुन्यांत गुरेढोरे आढळली. त्यात म्हशी आणि इतर पाळीव जनावरे यांचे प्रमाण



४० टक्के इतके आहे. पारंपरिक अभ्यास पद्धतीत सांबर हे सर्वाधिक शिकार केले जाणारे भक्ष्य आहे असे समोर येत होते. मात्र, डीएनए विश्लेषणात पाळीव जनवरांचे प्रमाण सर्वाधिक असल्याचे अभ्यासकांनी सांगितले.

**मेटाबारकोडिंग चाचणी अधिक प्रभावी का ?**

डीएनए मेटाबारकोडिंगद्वारे वाघ शिकार करीत असलेल्या इतर प्रजातीही समोर आल्या आहेत. यात पारंपरिक अभ्यास पद्धतीहून जवळपास दुप्पट भक्ष्य नोंदी समोर आल्या आहेत. पारंपरिक विश्लेषणात अनेकदा लक्षात न येणाऱ्या प्राण्यांच्या नोंदी यात पुढे आल्या आहेत. यात उंदीर, पक्षी आणि अस्वल (स्लॉथ बेअर) अशा शिकार केलेल्या प्राण्यांच्या नोंदीही घेण्यात आल्या आहेत. तसेच मेटाबारकोडिंग चाचणीमुळे वाघांनी केलेली प्रत्येक शिकार ओळखण्यास मदत झाली, असे अभ्यासकांचे मत आहे.आहार पद्धतींचा अधिक प्रभावीपणे अभ्यास करण्यासाठी डीएनए आधारित पद्धती महत्वाची आहे. मानव, पाळीव जनावरे आणि वन्यजीव यांचा परस्पर संपर्क वाढत असताना अशा पद्धतींचा अभ्यास गरजेचा आहे, अशा आशयाचे मत एनसीबीएसच्या प्राध्यापिका आणि सहसंशोधक उमा रामकृष्णन यांचे व्यक्त केले.

## चौसाळा येथे मा.खा.प्रितमताई मुंढे यांचा वाढदिवस विविध समाज उपयोगी उपक्रम राबवुन साजरा



दैनिक वादळ वार्ता
**बीड । प्रतिनिधी**

बीड तालुक्यातील चौसाळा येथे मा. खासदार प्रितमताई मुंढे यांचा वाढदिवस भारतीय जनता पार्टी बीड तालुका मंडळाच्या वतीने विविध समाज उपयोगी उपक्रम राबवुन साजरा करण्यात आला
चौसाळा येथील प्राथमिक आरोग्य केंद्रात रुग्णाना फळ वाटप करण्यात आली यावेळी भाजपा बीड तालुका मंडळ प्रमुख अशोक(दादा)रसाळ, भाजपा अनुसुचित जाती मोर्चाचे बीड तालुकाध्यक्ष पवन कुचेकर,बीड तालुका उपप्रमुख अंकुश गोरे, भाजपा बीड तालुका सरचिटणीस अप्पासाहेब झोडगे, भागवतराव आंधळे, चौसाळा शहर अध्यक्ष विनोद कळासे, महादेव चौधरी, बाळासाहेब हावळे पाटील, अक्षय माळी, पत्रकार बळीराम राऊत, प्रदीप जोगदंड यांच्यासह असंख्य भाजपा पदाधिकारी मोठया संख्येने उपस्थित होते.

# संपादकीय

## सातत्यपूर्ण पाठबळ हवे

आयटी क्षेत्रासाठी यंदाचा अर्थसंकल्प सकारात्मक आणि दूरदृष्टीपूर्ण ठरतो. कर सुलभीकरण, डिजिटल पायाभूत सुविधांवरील भर, एआय आणि नवोन्मेषाला चालना यामुळे हे क्षेत्र भारताच्या आर्थिक आणि सामाजिक परिवर्तनामध्ये आणखी महत्त्वाची भूमिका बजावेल.भारतात आयटी क्षेत्राचा विस्तार वेगाने झाला. भारतातील या क्षेत्राची गेल्या पंचवीस वर्षांमधली प्रगती जुन्या-जाणत्यांनाही चकीत करणारी आहे. या क्षेत्राने दिलेल्या संधींचा फायदा घेत भारतीय तरुणाईने यशाची नवी शिखरे सर केलीच, पण समृद्धीही मिळवली. आज हे भारताच्या प्रगतीच्या प्रवासातले महत्त्वाचे क्षेत्र ठरते आहे. देशाच्या अर्थकारणात या क्षेत्राची महत्त्वाची भूमिका आहे. कोणतेही उत्पादन न देता सेवेच्या बळावर हे क्षेत्र प्रगती करत आहे. अर्थात हार्डवेअर क्षेत्राचाही या ना त्या प्रकारे संबंध येत असल्याने एकूणच आयटी आणि संगणक क्षेत्र देशात हातात हात घालून प्रगती करत आहेत. त्यामुळेच या क्षेत्रातील घडामोडी, बदलत्या सरकारी तरतुदी, अमेरिकेसारख्या भल्या मोठ्या देशाचा या क्षेत्राच्या अर्थकारणात असणारा सहभाग महत्वाचा ठरतो. किंबहुना, अमेरिकेत सर्दी झाली तरी भारतात हुडहुडी भरते, असा प्रकार अनुभवायला मिळतो. असे अनेक घटक तपासत, समजून घेत आणि त्यांचा प्रभाव अनुभवत भारत या क्षेत्रातील वाटचाल सूकर करत असतो. गेले काही दिवस अमेरिका आणि भारताचे सातत्याने बदलत, वर-खाली होत असलेले संबंध आयटी क्षेत्रात तरंग उमटवत आहेत. कदाचित म्हणूनच व्हिसा किंवा नागरिकत्व देण्याच्या अमेरिकेच्या धोरणाबरोबरच भारतातील आर्थिक धुरीण या क्षेत्राच्या प्रगतीकडे कसे बघतात, त्याच्या समोर असलेल्या आव्हानांचा मागोवा कसा घेतात हे बघणे महत्वाचे ठरते. अमेरिकेत डोनाल्ड ट्रंप अध्यक्षपदी विराजमान झाल्यापासून हे क्षेत्र काही विक्षिप्त निर्णयांना आणि तरतुदींना सामोरे जात आहेच, पण सातत्यपूर्ण बदलही अनुभवत आहे. त्याचेच प्रतिबिंब ताज्या अर्थसंकल्पामध्ये पहायला मिळाले.केंद्रीय अर्थसंकल्प भारताच्या आर्थिक धोरणाचे प्रतीक असतो. माहिती तंत्रज्ञान अर्थात आयटी क्षेत्र हे भारताच्या जीडीपीमध्ये मोठे योगदान देणारे क्षेत्र असल्याने आयटीशी संबंधितांच्या अर्थमंत्र्यांकडून नेहमीच मोठ्या अपेक्षा असतात. भारताची अर्थव्यवस्था वेगाने बदलत असताना माहिती तंत्रज्ञान म्हणजेच आयटी क्षेत्र त्या बदलाचे प्रमुख इंजिन ठरले आहे. १९९०च्या दशकात सुरू झालेला संगणकीकरणाचा प्रवास आज कृत्रिम बुद्धिमत्ता, क्लाउड कम्प्युटिंग, सायबर सुरक्षा, डेटा नॅलिटिक्स आणि डिजिटल सार्वजनिक पायाभूत सुविधांपर्यंत पोहोचला आहे. या पार्श्वभूमीवर २०२६-२७ साठी सादर करण्यात आलेले केंद्रीय अंदाजपत्रक आयटी क्षेत्रासाठी अत्यंत महत्त्वाचे ठरले. हे अंदाजपत्रक केवळ आर्थिक आकड्यांपुरते मर्यादित न राहता भारताच्या डिजिटल भवितव्याची दिशा ठरवणारे आहे, असे म्हणणे वावगे ठरू नये. २०२६ च्या अंदाजपत्रकाचा मूलभूत उद्देश 'विकसित भारत' या संकल्पनेभोवती फिरतो. आर्थिक वाढ, रोजगारनिर्मिती, गुंतवणूक वाढवणे आणि तंत्रज्ञानाच्या साहाय्याने प्रशासन अधिक कार्यक्षम करणे हे या अंदाजपत्रकाचे प्रमुख स्तंभ आहेत. सुरुवातीला म्हटल्याप्रमाणे आयटी क्षेत्र या सर्व उद्दिष्टांचा केंद्रबिंदू असल्याने धोरणात्मक पातळीवर महत्त्वाचे निर्णय घेण्यात आले आहेत. या अंदाजपत्रकातील एक महत्त्वाचा बदल म्हणजे आयटी आणि आयटी-संबंधित सेवांचे एकत्रीकरण. सॉफ्टवेअर सेवा, आयटी-एनेबल्ड सर्व्हिसेस, ज्ञानाधारित प्रक्रिया सेवा आणि कराराधारित संशोधन या सर्व सेवा एका एकसमान 'माहिती तंत्रज्ञान सेवा' या वर्गाखाली आणण्यात आल्या आहेत. यामुळे कर नियमांमध्ये स्पष्टता येते, कंपन्यांवरील अनुपालनाचा ताण कमी होतो आणि उद्योगासाठी एक स्थिर, पूर्वानुमान करता येणारे वातावरण निर्माण होते. विशेषतः लहान आणि मध्यम आयटी कंपन्यांना याचा मोठा फायदा होणार आहे.ताज्या अर्थसंकल्पामध्ये डिजिटल पायाभूत सुविधांवर विशेष भर देण्यात आला आहे. डेटा सेंटर्स, क्लाउड सेवा आणि उच्च क्षमतेचे नेटवर्क हा आधुनिक डिजिटल अर्थव्यवस्थेचा कणा आहे. परदेशी क्लाउड कंपन्यांना भारतातील डेटा सेंटर्स वापरून जागतिक ग्राहकांना सेवा देण्यासाठी २०४७ पर्यंत 'टॅक्स हॉलिडे' जाहीर करण्यात आला आहे; भारतीय ग्राहकांसाठी स्थानिक रिसेलरद्वारे सेवा द्यावी लागेल. संबंधित डेटा सेंटर प्रदात्यांसाठी १५ टक्के खर्चावर सेफ हार्बर मार्जिन उपलब्ध आहे. भारताला जागतिक डेटा हब बनवण्याच्या दृष्टीने डेटा सेंटर्ससाठी करसवलती, दीर्घकालीन धोरणात्मक पाठबळ आणि गुंतवणुकीस पोषक वातावरण निर्माण करण्याचा प्रयत्न या अंदाजपत्रकात दिसून येतो. यामुळे परदेशी तसेच देशांतर्गत गुंतवणूक वाढून आयटी क्षेत्रात मोठ्या प्रमाणावर रोजगारनिर्मिती होण्याची शक्यता आहे. कृत्रिम बुद्धिमत्ता आणि उदयोन्मुख तंत्रज्ञान हा अंदाजपत्रकाचा आणखी एक महत्त्वाचा पैलू आहे. एआय, मशीन लर्निंग, रोबोटिक्स आणि सायबर सुरक्षेसारख्या क्षेत्रांमध्ये संशोधन, नवोन्मेष आणि कौशल्य विकासासाठी सरकारी पाठबळ देण्याचे संकेत मिळतात. आयटी क्षेत्र आता केवळ सेवा पुरवठादार न राहता नवकल्पनांचा स्रोत बनत आहे. स्टार्टअप्स, संशोधन संस्था आणि उद्योग यांच्यातील सहकार्यामुळे भारत जागतिक स्तरावर तंत्रज्ञानातील नेतृत्व भूमिका बजावू शकतो. मानव संसाधन विकास हा आयटी क्षेत्राचा कणा आहे. यंदाच्या अर्थसंकल्पामध्ये डिजिटल कौशल्य विकासावर दिलेला भर विशेष उल्लेखनीय आहे.आयटी क्षेत्राचा प्रभाव केवळ आर्थिक मर्यादेत न राहता प्रशासन, शिक्षण, आरोग्य आणि सामाजिक समावेशनापर्यंत विस्तारला आहे. डिजिटल सार्वजनिक पायाभूत सुविधा, ई-गव्हर्नन्स, ऑनलाइन शिक्षण आणि टेलिमेडिसिन यासारख्या उपक्रमांमुळे सामान्य नागरिकांचे जीवन सुलभ होत आहे. अंदाजपत्रक २०२६ या डिजिटल परिवर्तनाला गती देण्याचा प्रयत्न करते. यामुळे पारदर्शकता, कार्यक्षमता आणि समावेशक विकास साध्य होऊ शकतो. तथापि, या संधींसोबतच काही आव्हानेही आहेत. जागतिक आर्थिक अनिश्चितता, तंत्रज्ञानात झपाट्याने होणारे बदल आणि कौशल्यातील तफावत यांचा सामना आयटी क्षेत्राला करावा लागणार आहे. अंदाजपत्रकाने दिशा दिली असली तरी प्रत्यक्ष अंमलबजावणी, धोरणांची सातत्यपूर्ण अंमलबजावणी आणि उद्योग-शिक्षण-संशोधन यांच्यातील समन्वय अत्यावश्यक आहे. एकूणच, यंदाचा अर्थसंकल्प आयटी क्षेत्रासाठी सकारात्मक आणि दूरदृष्टीपूर्ण ठरतो. कर सुलभीकरण, डिजिटल पायाभूत सुविधांवरील भर, एआय आणि नवोन्मेषाला चालना तसेच कौशल्य विकासावर लक्ष यामुळे आयटी क्षेत्र भारताच्या आर्थिक आणि सामाजिक परिवर्तनात आणखी महत्त्वाची भूमिका बजावेल. योग्य अंमलबजावणी आणि सातत्यपूर्ण धोरणात्मक पाठबळ मिळाल्यास आयटी क्षेत्र भारताला 'विकसित राष्ट्र' बनवण्याच्या प्रवासात निर्णायक योगदान देईल, अशी आशा बाळगता येते.


# माझी जीभ कापायची असेल तर खुशाल कापा पण भाजपाला एक्सपोज करणे मी थांबणार नाही-सपकाळ

## देशातील ज्वलंत प्रश्नावरून जनतेचे लक्ष दुसरीकडे वळवण्यासाठी टिपू सुलतानच्या मुद्द्यावरून भाजपाची नौटंकी

दैनिक वादळ वार्ता

**मुंबई । अरविंद बनसोडे कुरनूरकर**

अदानी-अंबानी आणि अमेरिकेचे भले करणाऱ्या, संविधान बदलू पाहणाऱ्या भाजपला मी एक्सपोज करतो म्हणून भाजपाला माझी जीभ कापायची असेल तर खुशाल कापा, पण मी थांबणार नाही, भाजपाचा पर्दाफाश करतच राहणार असे महाराष्ट्र प्रदेश काँग्रेस कमिटीचे अध्यक्ष हर्षवर्धन सपकाळ यांनी ठणकावून सांगितले आहे. काँग्रेस प्रदेशाध्यक्ष हर्षवर्धन सपकाळ पुढे म्हणाले की, भाजपा आमदार व नेत्यांनी माझी जीभ कापून आणणाऱ्याला बक्षीस जाहीर केले आहे, माझी जीभ कापल्यानंतर जर भारतीय शेतकर्यांचे अमेरिकेतून होणार्या आयातीपासून संरक्षण होणार असेल, ही अन्यायकारक ट्रेड-डील रद्द होऊन शेतमालाला भाव मिळणार असतील, शेतकरी कर्जमुक्त होणार असेल, भाजप हिंदू-मुस्लिम द्वेषाला खतपाणी घालणार नसेल, चीनने बळकावलेला भूभाग परत मिळणार असेल तर माझी जीभ नक्की कापा. सपकाळ पुढे म्हणाले की, मी छत्रपती शिवाजी महाराज यांच्याबद्दल काहीही चुकीचे बोललो नाही. छत्रपती शिवाजी महाराज यांची किर्ती महान आहे, चंद्र जसा वाढत जातो तशीच महाराजांची किर्ती आणखी वाढत जावी, याबाबत दुमत नाही. परंतु भारतीय जनता पक्षाने माझ्या विधानाचा ध चा मा करून महाराष्ट्र पेटवण्याचा प्रयत्न केला, दंगली घडवण्याचा प्रयत्न केला, यामागचे कारस्थान समजून घेतले पाहिजे. एपस्टिन फाईल्समध्ये बरंच काही दडलेलं आहे, त्यावरून जनतेचे लक्ष विचलित करणे हा एक भाग आहे तर अमेरिकेबरोबरच्या व्यापार करारामुळे भारतातील शेतकऱ्यांचे जीवन उद्ध्वस्थ होणार आहे, महाराष्ट्रातही अनेक ज्वलंत प्रश्न आहेत. या सर्व मुद्द्यावर भाजपा सरकारकडे उत्तर नाही म्हणून या प्रश्नांवर भाजपाला पडदा टाकायचा आहे, यासाठी हा सर्व खटाटोप सुरु आहे, असेही हर्षवर्धन सपकाळ म्हणाले.



# केज नगर पंचायतीत ३.६२ कोटींचा 'घरकुल' घोटाळा

## उप विभागीय दंडाधिकारी यांच्या कडून सखोल चौकशीचे आदेश भ्रष्टाचाऱ्यांचे धाबे दणाणले!

दैनिक वादळ वार्ता

**केज । प्रतिनिधी**

केज नगरपंचायत मधील 'प्रधानमंत्री आवास योजने'अंतर्गत (घरकुल) झालेल्या कोट्यवधींच्या कथित घोटाळ्याने संपूर्ण बीड जिल्ह्यात खळबळ उडाली आहे.गरिबांच्या हक्काचे पैसे ठेकेदार आणि भ्रष्ट अधिकाऱ्यांनी संगनमताने लाटल्याचा धक्कादायक प्रकार समोर आला असून,या प्रकरणाची गांभीर्याने दखल घेत उपविभागीय दंडाधिकारी यांनीसखोल चौकशीचे आदेश दिले आहेत.या हाय-प्रोफाइल चौकशीमुळे भ्रष्ट अधिकारी,पुढारी आणि बोगस लाभार्थ्यांचे धाबे दणाणले आहेत.




**नेमके प्रकरण काय?**

केज नगरपंचायत अंतर्गत प्रधानमंत्री आवास योजनेतील पात्र लाभार्थ्यांना हक्काचे पैसे मिळण्याऐवजी,ते पैसे नियमबाह्यपणे इतरत्र वळवण्यात आले आहेत. मे २०१९ ते जानेवारी २०२२ या कालावधीत म्हाडाकडून प्राप्तझालेला निधी आणि त्यावरील व्याजाची रक्कम लाभार्थ्यांना न देता,ती ठेकेदार व कर्मचाऱ्यांना धनादेशाद्वारे वाटण्यात आली.

**घोटाळ्याची भीषणता,निधीची लूट**

३७४ लाभार्थ्यांच्या हक्काच्या ८ कोटी १० लाख रुपयांपैकी तब्बल ३ कोटी ६२ लाख रुपयांवर डल्लामारण्यात आला आहे.

**फायली गायब**

ज्या कामांसाठी पैसे दिले गेले,त्या कामांच्या कोणत्याही संचिका, देयके किंवा मोजमाप पुस्तके(Measurement Books) नगरपंचायत कार्यालयात उपलब्ध नाहीत.

**नियमबाह्य व्यवहार**

अर्धे तुम्ही घ्या,अर्धे आम्ही घेतो अशा भ्रष्ट तडजोडीतून हा सर्व प्रकार घडल्याचा संशय आहे.उप विभागीय दंडाधिकारी यांच्या कडून चौकशीचा फास आवळला जिल्हाधिकारी विवेक जॉन्सन यांच्या सूचनेनुसार,उपविभागीय दंडाधिकाऱ्यांनी आता या प्रकरणाची सूत्रे हाती घेतली आहेत.प्रशासनाने नगरपंचायतीकडून घरकुलांचे सर्व रेकॉर्ड्स, बँक स्टेटमेंट्स आणि लाभार्थ्यांची यादीताब्यात घेण्यास सुरुवात केली आहे. शासकीय योजनेचा पैसा गरजूंपर्यंत पोंहोचण्या ऐवजी जर तो चुकीच्या मार्गाने जात असेल,तर त्याची गय केली जाणार नाही.दोषींवर कठोर कारवाई केली जाईल.

**प्रशासन सूत्रे कोणाचे चेहरे समोर येणार?**

समितीने बँकेकडून व्यवहारांचे सर्व तपशील मिळवले असून,त्यातून पैसे लाटणाऱ्यांची एक मोठी यादी समोर आली आहे.यामध्ये केवळ धनादेश देणारे अधिकारी च नव्हे,तर बेकायदेशीर पणे पैसे स्वीकारणारे ठेकेदार,कर्मचारी आणि काही भ्रष्ट स्थानिक पुढारी देखील उप विभागीय दंडाधिकारी यांच्या रडारवर आले आहेत.या चौकशीतून केज शहरातील भ्रष्टाचाराचे नेमके किती 'बडे मासे' गळाला लागतात,याकडे आता संपूर्ण जिल्ह्याचे लक्ष लागले आहे.


# निसर्गाच्या कुशीत घुमला 'याहा मोगी'चा जयघोष

## २७०० पायऱ्या चढून भक्तांनी गाठले श्रद्धेचे शिखर!

दैनिक वादळ वार्ता

**नंदुरबार । दिपक गोसावी**

सह्याद्रीच्या उत्तुंग रांगा, डोंगरकपारीतून वाहणारा गार वारा आणि ओसंडून वाहणारा भक्तीचा महापूर... अशाच काहीशा मंगलमय वातावरणात नवापूर तालुक्यातील बर्डीपाडा-धामणधरी गडावर 'आदिवासींची कुलदैवत' आई याहा मोगी मातेचा यात्रोत्सव मोठ्या थाटात संपन्न झाला. महाशिवरात्रीच्या पावन पर्वावर निसर्गाच्या कुशीत वसलेले हे शक्तिपीठ आध्यात्मिक ऊर्जेने न्हाऊन निघाले होते.



उंच कडा, अथांग नभ, अन भक्तीची ही ओढ,
याहा मोगीच्या चरणी मिळे, आयुष्याचा गोड...

सुमारे २७०० फूट उंचीवर वसलेल्या या पवित्र धामाकडे जाण्यासाठी भाविकांनी पहाटेपासूनच मोठी गर्दी केली होती. अंगात भक्तीची शक्ती असल्याने अबालवृद्धांच्या पाऊलांना जणू पंख फुटले होते. प्रत्येक पायरीवर 'याहा मोगी माता की जय' असा जयघोष करत हजारो भाविकांनी मातेचे दर्शन घेतले. नवसाला पावणारी माता अशी ख्याती असल्याने केवळ महाराष्ट्रच नव्हे, तर शेजारील गुजरात राज्यातूनही श्रद्धेचा जनसागर येथे लोटला होता.

या यात्रेचे सर्वात मोठे वैशिष्ट्य म्हणजे मातेचा 'पवित्र स्नान' विधी. स्थानिक बोलीभाषेत मंत्रोच्चार करत, अतिशय सात्विक पद्धतीने हा सोहळा पार पडला. यावेळी भाविकांनी मातेच्या चरणी विविध कडधान्ये अर्पण केली. या प्रसादामागे एक नितांत सुंदर भावना दडलेली आहे:

मातेचा हा प्रसाद ठरे, शेतीचा आधार,
रानात पेरता दाणा, लाभे सुखाचा अहेर...

हेच 'प्रसादी धान्य' शेतकरी आपल्या घरी नेतात आणि पावसाळा सुरू होताच आपल्या शेतात पेरतात. मातेच्या आशीर्वादाने पीकपाणी उत्तम येईल आणि घरात समृद्धी नांदेल, अशी गाढ श्रद्धा या परंपरेमागे आहे.

पुजारी जामसिंग गावित यांच्या स्वप्नपूर्तीतून साकारलेल्या या मंगल धामाच्या व्यवस्थेसाठी स्थानिक लोकप्रतिनिधी आणि ग्रामस्थांनी विशेष परिश्रम घेतले. माजी उपसभापती शिवाजी गावित, देवजीशेट गावित यांच्यासह असंख्य स्वयंसेवकांनी भाविकांच्या सेवेसाठी रात्रंदिवस काम केले. विसरवाडी पोलीस स्टेशनचे सहाय्यक पोलीस निरीक्षक नरेंद्र साबळे यांच्या मार्गदर्शनाखाली चोख बंदोबस्त असल्याने, हजारोची गर्दी असूनही हा सोहळा अत्यंत शिस्तीत आणि शांततेत पार पडला.

धामणधरीचा हा परिसर केवळ पर्यटनासाठीच नव्हे, तर भक्ती आणि परंपरेचे जतन करणारे एक महत्त्वपूर्ण केंद्र म्हणून आता उदयास येत आहे.

# तळोदा येथे 'राष्ट्रीय वयोश्री योजना' शिबिरास उत्स्फूर्त प्रतिसाद

## शेकडो ज्येष्ठ नागरिकांची मोफत उपकरणांसाठी नोंदणी

दैनिक वादळ वार्ता

**नंदुरबार । दिपक गोसावी**

पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या संकल्पनेतील 'राष्ट्रीय वयोश्री योजने' अंतर्गत ज्येष्ठ नागरिकांना स्वावलंबी बनवण्यासाठी तळोदा येथे आयोजित करण्यात आलेले भव्य तपासणी व नोंदणी शिबिर अत्यंत उत्साहात पार पडले. शहादा-तळोदा मतदारसंघाचे आमदार राजेश पाडवी यांच्या विशेष पुढाकारातून आणि भारतीय कृत्रिम अंग निर्माण निगम यांच्या सहकार्याने १७ फेब्रुवारी २०२६ रोजी माळी समाज मंगल कार्यालयात या उपक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. वाढत्या वयानुसार येणाऱ्या शारीरिक व्याधींवर मात करण्यासाठी ज्येष्ठ नागरिकांना अनेक सहाय्यक साधनांची आवश्यकता असते. हे साहित्य अत्यंत महागडे असल्याने अनेक गरजू ज्येष्ठ त्यापासून वंचित राहतात. हीच बाब लक्षात घेऊन आयोजित या शिबिरात शेकडो नागरिकांनी आपली नोंदणी पूर्ण केली. या योजनेद्वारे मोफत दिले जाणार आहे त्यात घडीचे वॉकर, चालण्याची काठी, चाकाची खुर्ची अत्याधुनिक श्रवणयंत्रे आणि चष्मे.कमोड खुर्ची, पाठीचा पट्टा, मानेचा, गुडघ्याचा व कंबरेचा पट्टा. शिबिराचे उद्घाटन आमदार राजेश पाडवी यांच्या हस्ते करण्यात आले. यावेळी माजी लोकनियुक्त नगराध्यक्ष अजय परदेशी, गट विकास अधिकारी किर्वे, विलास डामरे, शहराध्यक्ष गौरव वाणी, स्थानिक नेते जितेंद्र सूर्यवंशी, सुभाष चौधरी, नगरसेवक हितेंद्र क्षत्रिय, अनुप गौतम जैन, जगदीश परदेशी उदासी, संदीप परदेशी, जितेंद्र दुबे, सुरज माळी, कपिल कर्णकार, राहुल पाडवी, विवेक पाडवी, गोविंदा पाडवी यांसह अनेक मान्यवर उपस्थित होते.तळोदा परिसरातील ग्रामीण व शहरी भागातून ज्येष्ठांनी या शिबिराचा लाभ घेतला. शासकीय योजना घरापर्यंत पोहोचवल्याबद्दल नागरिकांनी समाधान व्यक्त केले. अशा प्रकारची शिबिरे भविष्यातही आयोजित करण्यात यावीत, अशी अपेक्षा यावेळी उपस्थितांनी व्यक्त केली. शिबिराच्या यशस्वीतेसाठी भारतीय कृत्रिम अंग निर्माण निगमच्या तंत्रज्ञांनी व स्थानिक कार्यकर्त्यांनी परिश्रम घेतले.



> ज्येष्ठ नागरिक हे समाजाचा आधारस्तंभ आहेत. त्यांच्या उर्वरित आयुष्यात त्यांना कोणावरही विसंबून राहावे लागू नये आणि त्यांचे दैनंदिन जीवन सुखकर व्हावे, हाच या शिबिरामागचा मुख्य उद्देश आहे.
>
> आमदार-राजेश पाडवी.

# नरेंद्र देवेंद्र महोत्सवासाठी नांदेडकरांना उपस्थित राहण्याचे आवाहन

दैनिक वादळ वार्ता
**नांदेड । प्रतिनिधी**

शहरातील सर्वांच्या उत्सुकतेचा विषय ठरलेल्या २१ व २२ फेब्रुवारी ला होणारा नरेंद्र–देवेंद्र महोत्सवाच्या तयारीला आता अधिकृत सुरुवात झाली असून कै. चंद्रभागा केरबा गंजेवार नगरी, नवा मोंढा मैदान, नांदेड येथे व्यासपीठ उभारणी व बैठक व्यवस्थेच्या कामाचा शुभारंभ भाजपा महानगराध्यक्ष अमरनाथ राजूरकर यांच्या हस्ते करण्यात आला.पंचवीस हजार पेक्षा जास्त रसिक उपस्थित राहतील असा विश्वास स्वागताध्यक्ष शिवप्रसाद राठी व महोत्सवाचे संयोजक धर्मभूषण ड. दिलीप ठाकूर यांनी व्यक्त केला.यावेळी प्रवीण साले,मिलिंद देशमुख, किशोर भवरे, आशिष नेरळकर, विजय येवणकर, शीतल खांडील,विजय गंभीरे, अनुसूचित जाती मोर्चा अध्यक्ष जनार्दन गुपिले सर,उपाध्यक्ष बागड्या यादव, रामजी भानुशाली, सतीश बेरूळकर यांचा शिवप्रसाद राठी यांनी सत्कार केला. सूत्रसंचालन सरचिटणीस शीतल खांडील यांनी केले. यावेळी बोलताना भाजपा महानगराध्यक्ष अमरनाथ राजूरकर यांनी असे सांगितले की, कुबेरनगरी प्रस्तुत नरेंद्र–देवेंद्र महोत्सव हा केवळ सांस्कृतिक कार्यक्रम नसून शहरातील सामाजिक, शैक्षणिक व विविध क्षेत्रातील घटकांना एकत्र आणणारा उत्सव आहे. प्रत्येक नागरिकाला अभिमान वाटेल असा भव्य आणि शिस्तबद्ध कार्यक्रम साकार करण्यासाठी नेहमीप्रमाणे नांदेडकरांनी हजारोंच्या संख्येने उपस्थित रहावे, असे आवाहन त्यांनी केले.





कार्यक्रम स्थळी येणाऱ्या हजारो नागरिकांच्या दृष्टीने भव्य व सुरक्षित व्यवस्था उभारणे अत्यंत महत्त्वाचे मानले जात आहे. याच पार्श्वभूमीवर प्रशस्त व्यासपीठ, आकर्षक सजावट, मजबूत ध्वनीव्यवस्था, प्रकाशयोजना तसेच सुव्यवस्थित बैठक व्यवस्था यासाठी नियोजनबद्ध पद्धतीने काम सुरू करण्यात आले आहे.विशेष म्हणजे ज्येष्ठ नागरिक, महिला व पत्रकार बांधवांसाठी तसेच व्हिआयपी पास धारकांसाठी स्वतंत्र व सोयीस्कर बैठक व्यवस्था करण्यात येणार आहे. कार्यक्रम सुरळीत पार पडावा यासाठी स्वयंसेवकांची नियुक्ती, वाहतूक नियोजन, पिण्याच्या पाण्याची व्यवस्था तसेच सुरक्षेच्या दृष्टीने आवश्यक उपाययोजना केल्या जात आहेत.वेळेवर उपस्थित राहणाऱ्या रसिकांना भाजपा कामगार आघाडीचे जिल्हाध्यक्ष सुरेश लोट यांच्या तर्फे १० कलर टीव्ही मोफत देण्यात येणार आहेत.

शनिवार दि. २१ फेब्रुवारी रोजी चौदावा मराठी हास्य दरबार आयोजित करण्यात आला आहे. या हास्य दरबारात स्टँडअप कॉमेडीचे बादशहा बंडा जोशी, झी हास्य सम्राट मधील लोकप्रिय कलाकार सिद्धार्थ खिल्लारे तसेच शाहीर रमेश गिरी हे आपल्या विनोदी शैलीतून रसिकांचे भरभरून मनोरंजन करणार आहेत.तसेच चला हवा येऊ दे फेम सतीश कासेवार यांचा खास महिलांसाठी होम मिनिस्टर – खेळ पैठणीचा हा विशेष कार्यक्रम आयोजित करण्यात आला आहे. या कार्यक्रमात लालपोतू कलेक्शन तर्फे २५ पैठणी व ऑरगंज्या साडया महिलांना मोफत देण्यात येणार आहेत.या दिवशी रमेश पारसेवार, ड. गजानन पिंपरखेडे, रत्नाकर वाघमारे व गंगाप्रसाद तोष्णीवाल यांना नांदेड भूषण पुरस्कार देऊन गौरविण्यात येणार आहे. तसेच सुधाकर पत्रभूषण पुरस्काराने पन्नालाल शर्मा, अभय कुळकजाईकर, चारुदत्त चौधरी, संतोष पांडागळे व रामेश्वर काकडे यांचा सन्मान करण्यात येणार आहे.

दुसऱ्या दिवशी २२ फेब्रुवारी रोजी चोवीसावे अखिल भारतीय विराट कविसंमेलन पार पडणार आहे. या कविसंमेलनात मेरठ (उ.प्र.) येथील हास्य संचालक व क्रांती कवी सौरभ जैन सुमन, जबलपूर (म.प्र.) येथील हास्य गीतकार सुदीप भोला, भिलवाडा (राजस्थान) येथील व्यंग्य कवी दीपक पारेख, मैनपुरी (उ.प्र.) येथील वीर रस कवी डॉ. मनोज चौहान, सुरत (गुजरात) येथील शृंगार रस कवयित्री सोनल जैन तसेच दिल्लीच्या वीर रस कवयित्री नेहा शर्मा ‘नमन’ यांचा सहभाग असणार आहे.याच कार्यक्रमात माजी मुख्यमंत्री अशोकराव चव्हाण यांना नांदेड भूषण पुरस्काराने सन्मानित करण्यात येणार आहे.

कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी सुरेश लोट, कामाजी सरोदे, सुरेश शर्मा, राजेशसिंह ठाकूर, संतोष भारती, प्रज्वल कांडलकर, संतोष शिंदे, श्रीनिवास अण्णा, महेंद्र शिंदे, गजानन कापसे, प्रभुदास वाडेकर,बलराम मुदिराज पेंटर हे परिश्रम घेत आहेत.

## मोगरगा येथे महाविकास आघाडीच्या नवनिर्वाचीत जि.प.व पं.स सदस्यांचा सत्कार सोहळा संपन्न

दैनिक वादळ वार्ता
**औसा । प्रतिनिधी**

औसा तालुक्यातील मोगरगा येथे महाविकास काँग्रेस ,राष्ट्रवादी काँग्रेस व शिवसेना (उबाठा)आघाडीच्या वतिने निवडुन आलेल्या जिल्हा परीषद व पंचायत समिती सदस्यांचा सत्कार सोहळा संपन्न झाला ,कार्यक्रमाच्या अध्यक्ष स्थानी संतोष सोनवने हे होतै यावेळी काँग्रेसचे किल्लारी जिल्हा परीषद सदस्य सुभाषदाजी पवार ,खरोसा जिल्हा परीषद सदस्य तानाजी जाधव ,आशिव जिल्हा परीषद सदस्य सईताई गोरे ,खरोसा पंचायत समिती सदस्य शितल फावडे,लामजना पंचायत समिती सदस्य महेबुब कारभारी ,तळणी पंचायत समिती सदस्य अभिजीत देशमुख ,पंचायत समिती सदस्या पंचफुलाबाई घोडके यांचा निवडणुकीत मोठ्या मताधिक्याने विजय झाल्याबद्धल मोगरगा येथे सत्कार सोहळा आयोजीत केला होता ,यावेळी काँग्रेस नेते शेषेराव पाटील ,



काँग्रेसचे औसा तालुकाध्यक्ष किरण बापू बाबळसुरे, विलास काळे ,उद्धव गोरे ,कार्याध्यक्ष बाळासाहेब सांगवे ,आशोक खरपडे सलीम पटेल ,मुकेश बिदादा,युवक विधानसभा अध्यक्ष संजय लोंढे ,प्रकाश मिरगे ,अतुल कदम ,दिनकर काळे ,विजयकुमार सोनवणे, चंद्रकांत हासकुडे ,शिवाजी पाटील ,शिवाजी हंगरगे ,शुभम निकम, शुभम माडजे ,गोविंद टोम्पे ,महेश हंगरगे, प्रशांत पाटील ,भरत चांदुरे, सुशांत निकम ,कृष्णा निकम ,विशाल निकम, सुदर्शन पाटील ,सायमन रुब्दे ,मेघराज पाटील, संभाजी निकम ,सुशांत निकम ,गणेश चांदुरे, सौदागर जाधव, युवराज पाटील, बाळू गुरव ,दिलीप जाधव ,अमर जळकोटे, मेहताब पटेल,सह मोगरगा गावातील ग्रामस्थ मोठ्या संख्येने उपस्थित होते.

## सिरोंचा तालुक्यातील जप्राबाद ग्रामपंचायतीत रस्त्यावर कचरा व जनावरांमुळे नागरिक त्रस्त

दैनिक वादळ वार्ता
**सिरोंचा । प्रतिनिधी**

सिरोंचा तालुक्यातील जप्राबाद ग्रामपंचायत हद्दीत सध्या रस्त्यावर कचरा टाकणे तसेच गाय–बैल, ट्रॅक्टर उभे करणे आणि बैलबंडी बांधून ठेवण्याचे प्रकार वाढले आहेत. यामुळे गावातील मुख्य रस्त्यावरून ये–जा करणाऱ्या नागरिकांना मोठा त्रास सहन करावा लागत आहे.

ग्रामस्थांच्या म्हणण्यानुसार, काही नागरिक घरगुती कचरा थेट रस्त्यावर टाकत आहेत. त्यातच रस्त्याच्या कडेला ट्रॅक्टर उभे करणे व जनावरे बांधून ठेवणे यामुळे वाहतुकीस अडथळा निर्माण होत आहे. शाळकरी मुले, महिला व ज्येष्ठ नागरिकांना विशेषतः अडचणींचा सामना करावा लागत आहे.

रस्त्यावर साचलेल्या कचऱ्यामुळे दुर्गंधी पसरत असून आरोग्याचा प्रश्नही निर्माण झाला आहे. पावसाळ्यात ही परिस्थिती अधिक गंभीर होण्याची शक्यता व्यक्त केली जात आहे.



ग्रामपंचायत प्रशासनाने तात्काळ कारवाई करून रस्ते मोकळे करावेत, कचरा व्यवस्थापनासाठी ठोस उपाययोजना कराव्यात आणि नियमभंग करणाऱ्यांवर दंडात्मक कारवाई करावी, अशी मागणी ग्रामस्थांकडून होत आहे.

या संदर्भात ग्रामपंचायत व संबंधित विभागाने त्वरित लक्ष घालून गावातील रस्ते स्वच्छ व अडथळामुक्त करावेत, अशी सर्वसामान्यांची अपेक्षा आहे

## आंगणवाडी केंद्रातील शौचालय गैरवापर प्रकरण;तात्काळ चौकशीची मागणी





दैनिक वादळ वार्ता
**सिरोंचा । प्रतिनिधी**

सिरोंचा तालुक्यातील ग्रामपंचायत रंगयापल्ली अंतर्गत आंगणवाडी केंद्र क्रमांक १ येथे बांधण्यात आलेले शौचालय वापरासाठी अयोग्य अवस्थेत असून, ते सध्या अन्नसाठवणुकीसाठी वापरले जात असल्याचा गंभीर आरोप करण्यात आला आहे. या प्रकारामुळे लहान मुलींच्या आरोग्य व सुरक्षिततेचा प्रश्न निर्माण झाल्याचे निवेदनात नमूद करण्यात आले आहे.

संबंधित केंद्रात शौचालयाला दरवाजा नसणे, स्वच्छतेचा अभाव आणि पाण्याची सुविधा नसणे अशा त्रुटी असल्याचे सांगण्यात आले आहे. केंद्रात सार्वजनिक निधीतून सुविधा उभारण्यात आल्याचे असताना त्या वापरात नसल्याबाबत संताप व्यक्त केला जात आहे.

या प्रकरणी ग्रामस्थांनी गटविकास अधिकारी, पंचायत समिती सिरोंचा यांच्याकडे लेखी निवेदन सादर करून तात्काळ चौकशी करून जबाबदारांवर कारवाई करावी, तसेच शौचालय त्वरित दुरुस्त करून बालकांच्या वापरासाठी उपलब्ध करून द्यावे, अशी मागणी केली आहे. तसेच बांधकामासाठी मंजूर निधी व खर्चाची माहिती जाहीर करावी, अशीही मागणी करण्यात आली आहे.

प्रशासनाने या गंभीर बाबीकडे लक्ष देऊन तातडीने कार्यवाही करावी, अशी अपेक्षा ग्रामस्थांकडून व्यक्त होत आहे.


## पत्रकार राजू पाटील यांना जीवन गौरव पुरस्कार जाहीर

दैनिक वादळ वार्ता
**औसा । प्रतिनिधी**

औसा येथिल जेष्ठ पत्रकार तथा द रिंगण लाइव्ह चे संपादक श्री राजू पाटील यांना स्मॉल आणि मिडियम न्युजपेपर्स असोसिएशन महाराष्ट्र, यांचा ' जीवन गौरव पुरस्कार ' जाहीर झाला आहे.

पत्रकारितेच्या क्षेत्रातील उत्तम आणि धाडसी कामगिरी बद्दल व पत्रकारितेतील दीर्घकालीन योगदाना बद्दल हा पुरस्कार देण्यात येत असल्याचे सदर संस्थेने म्हटले आहे.

येत्या २१ फेब्रुवारी रोजी, वरोरा जिल्हा चंद्रपूर येथे हा पुरस्कार माजी मंत्री श्री सुधीरभाऊ मनगुंटीवार यांच्या हस्ते व पत्रकारांच्या भव्य शिबीरात हा पुरस्कार प्रदान करण्यात येणार आहे, असे निवेदन या संस्थेचे राष्ट्रीय अध्यक्ष श्री उत्तमराव वाडकर, राष्ट्रीय सरचिटणीस श्री ईश्वरसिंग सेंगर यांनी केले आहे. या निवडीबद्दल श्री राजू पाटील यांचे संपूर्ण मराठवाड्यातून अभिनंदन केले जात आहे.



## देगलूर शिव जन्मोत्सव सोहळा २०२६ व रक्तदान शिबराचे उदघाटन

दैनिक वादळ वार्ता
**देगलूर । प्रतिनिधी**

चार दिवसीय शिव जन्मोत्सव सोहळा देगलूर २०२६ चे उदघाटन व रक्तदान शिबिराचा १६/०२/२०२६ रोजी सकाळी १०:३० वाजता उदघाटक आमदार जितेश अंतापुरकर यांच्या हस्ते डॉ.

मयुर कद्रेकर यांच्या अध्यक्षतेखाली छत्रपती शिवाजी महाराज यांचे पुजन दीपप्रज्वलन करून प्रारंभ झाला .यावेळी शिवाजीराव देशमुख बळेगावकर शंकरराव कन्तेवार अँड प्रितम देशमुख लक्ष्मीकांतजी पदम्वार , बालाजी पाटील थडके जनार्दन बिरादार प्रशांत दासरवाड मिलिंद बिरकंगन शिवजन्मोत्सव अध्यक्ष नामदेव पाटील थडके यांच्या सह अँड अंकुश राजे जाधव खालिद पटेल गजानन पाटील राजु देशमुख ढोसनीकर डॉ सुनील जाधव बालाजी पाटील जाधव संजय कांबळे असलम शेख विठ्ठलराव भोसले प्रा



दिलीप भडके संतोष जाधव माधव पाटील संदीप शिंदे आदी शिव जन्मोत्सव समिति चे पदाधिकारी यांच्या सह जेजेराव पाटील शिंदे सुधाकर पाटील शहाजी बाबरे सुर्यकांत येलबुगडे उमाकांत भुताळे नवनाथ पाटील श्रिनिवासा रक्त संकलन केंद्र देगलूर चे डॉ किरण बिरादार डॉ प्रणिता बिरादार सुरेश देशमुख व सर्व कर्मचारी यांच्या सह सर्व शिव प्रेमी यांची मोठ्या संखेने उपस्थिती होती . प्रमुख पाहुण्याचा शिव स्मारक प्रतिमा देऊन सत्कार करण्यात आला . आमदार जितेश भाऊ यांनी लोककल्याणकारी उपक्रम राबवून आदर्श जीवन वाचवण्याचे काम सामाजिक बांधिलकी जपून करण्यात आली हे कौतुकास्पद आहे असे प्रतिपादन केले . सुत्र संचलन डॉ. सुनील जाधव यांनी केले . आभार अँड अंकुश राजे जाधव यांनी मांडले . यावेळी उदघाटन सोहळ्या नंतर शिव प्रेमी महिला व पुरुष यांनी सहभाग नोंदवत ११५ जनांनी रक्त दान केले अशी माहिती अध्यक्ष नामदेव पाटील थडके यांनी दिली . सहभागी रक्त दात्यांना सहभाग प्रमाण पत्र देऊन गौरवण्यात आले . दुपारी दोन वाजता रांगोळी स्पर्धेचे उदघाटन श्वेता बसवराज पाटील हस्ते विठ्ठलराव भोसले यांच्या अध्यक्षतेखाली झाले यावेळी संजीवनी ताई सुर्यवंशी शिला ताई देसाई यांनी परीक्षक म्हणुन पदभार पहिला सुरेखा लोणे महागावे ताई भोसले ताई यांची प्रमुख उपस्थिती होती . शालेय सातवी पर्यंत विद्यार्थ्यांनी आठवी ते दहावी व दहावी पुढील खुला गटात सहभाग नोंदवला या तीन गटात प्रथम द्वितीय त्रुतिय विजेत्यांना ट्रॉफी व विजेता प्रमाण पत्र देऊन गौरविण्यात आले .सहभागी सर्वांना सहभाग प्रमाण पत्र देण्यात आले . अध्यक्ष नामदेव पाटील थडके व सर्व शिव जन्मोत्सव समिति २०२६ समिति यांनी उपक्रम यशस्वी केले .

# मराठवाडा स्तरीय बैलगाडा शर्यती मध्ये १४० बैलगाडा प्रेमींचा सहभाग

## उमरीचा किताब मिळवला ‘जय हनुमान प्रसन्न’ बैलगाड्याने

**दैनिक वादळ वार्ता**
**माजलगाव । प्रतिनिधी**

तालुक्यातील उमरी (बु) येथे दरवर्षी शिवजन्मोत्सवानिमित्त बैलगाडा शर्यतीचे आयोजन केले जाते. यावर्षी बैलगाडा शर्यतीचे तिसरे वर्ष होते. या बैलगाडा शर्यतीमध्ये १४० बैलगाडा प्रेमींनी सहभाग घेतला होता. यावर्षीचा पहिला किताब ‘जय हनुमान प्रसन्न’ बप्पासाहेब गोवर्धन इंदुरे यांच्या बैलगाड्याने उमरीचा किताब जिंकला.शिवजन्मोत्सवानिमित्त उमरी येथे मराठवाडा स्तरीय बैलगाडा शर्यतीचे आयोजन दि. १७ रोजी शिवकेसरी मैदान येथे करण्यात आले होते. या बैलगाडा शर्यतीमध्ये १४० बैलगाडा प्रेमींनी सहभाग घेतला होता. बैलगाडा शर्यतीमध्ये एकूण वीस फेऱ्या घेण्यात आल्या. यामध्ये चार उपांत्यपूर्व फेऱ्या झाल्या तर शेवटी आठ बैलगाड्यांमध्ये अंतिम फेरी झाली. यामध्ये प्रथम आलेल्या बप्पासाहेब गोवर्धन इंदुरे यांच्या ‘जय हनुमान प्रसन्न’ या बैलगाड्यास उमरीचा प्रथम किताब देण्यात आला. त्यांना ३१ हजार १३१ रुपये कृषी उत्पन्न बाजार समितीचे संचालक आसाराम घायतिडक यांच्या हस्ते देण्यात आले. दुसरा किताब ‘म्हळसोकी प्रसन्न’ आकाश भैया हरगुडे (एम.एस. २२) यांना २१ हजार १२१ रुपये बैलगाडा शर्यत आयोजक कमिटी कडून देण्यात आले. तिसरे बक्षीस ‘जय हनुमान भारत चौधरी चेतक’ अमोल जाधव यांनी पटकावले. त्यांना ११ हजार १११ रुपये महादेव माने व मुंजाभाऊ घायतिडक यांच्या तर्फे देण्यात आले. चौथे बक्षीस ‘महारूद्र प्रसन्न’ हदगाव यांना ७ हजार ७७७ रुपये उद्धव पौळ व आरोही लेडीज एम्पोरियम, माजलगाव यांच्या वतीने देण्यात आले. पाचवा किताब मुजीद पठाण, बाबानगरचा ‘बल्या डॉन’ याने मिळवला. त्यांना ७ हजार ७७७ रुपये चेअरमन ज्ञानेश्वर आसाराम घायतिडक यांच्या वतीने देण्यात आले. सहावा किताब ‘नगद नारायण प्रसन्न’ आदिती गोरे यांनी पटकावला. त्यांना बळीराम सुखदेव घायतिडक यांच्या कडून ५ हजार ५५५ रुपये देण्यात आले. सातवा किताब ‘पब्लिक किंग रणवीर’ गोरख पणकुठे यांनी जिंकला. त्यांना ४ हजार ४४४ रुपये परमेश्वर इनामकर व आबासाहेब सोनवणे यांच्या कडून देण्यात आले. आठवा किताब ‘आई येडेश्वरी प्रसन्न’ हादगाव यांनी जिंकला. त्यांना नितीन अण्णासाहेब घायतिडक यांच्या कडून ३ हजार ३३३ रुपये बक्षीस देण्यात आले. विजयी बैलगाडा मालकांना रोख बक्षीस व सन्मानचिन्ह देऊन त्यांचा गौरव करण्यात आला. यावेळी उमरी परिसरातील बैलगाडा प्रेमी मोठ्या संख्येने उपस्थित होते.



# प्रा.सुदर्शन स्वामी यांना पीएच.डी पदवी प्रदान

**दैनिक वादळ वार्ता**
**माजलगाव । प्रतिनिधी**

येथील सुंदरराव सोळंके महाविद्यालयातील इतिहास विषयाचे प्रा. सुदर्शन उद्धवराव स्वामी यांना डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठा अंतर्गत इतिहास विषयामध्ये पीएच.डी प्रदान करण्यात आली आहे.प्रा. सुदर्शन उद्धवराव स्वामी यांनी प्राचार्य डॉ. गौतम पाटील यांच्या मार्गदर्शनाखाली महाराष्ट्रातील अस्पृश्यांचे धर्मांतर : एक ऐतिहासिक अभ्यास (इ.स. १९४७ - २००७) या विषयावर डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठात शोध प्रबंध सादर केला होता.



प्रा. सुदर्शन स्वामी यांच्या यशाबद्दल म.शि. प्र.मंडळाचे अध्यक्ष आमदार प्रकाश सोळंके, सरचिटणीस आ. सतीश चव्हाण, यांच्यासह महाविद्यालय विकास समिती सदस्य ऍड. बी. आर. डक, सत्यप्रकाश रुद्रवार, डॉ. बी. एल. चव्हाण, प्राचार्य डॉ. जी. के. सानप, प्रा. प्राचार्य डॉ. एन. के. मुळे, उपप्राचार्य डॉ. एम. ए. कव्हळे, उपप्राचार्य प्रकाश गवते, उपप्राचार्य पवन शिंदे डॉ. बालाजी बोडके, डॉ. अरुण पेंटावार, डॉ. शंकर इप्पर, डॉ. सचिन रुद्रवार, डॉ. डी. एस. शिंदे, डॉ. बिलास काळे, डॉ. सतीश डाके, प्रा. एस. एस. कदम यांच्यासह प्राध्यापक व कर्मचाऱ्यांनी अभिनंदन केले.

# बसवराज आरळे यांचे निधन

**दैनिक वादळ वार्ता**
**लोहा । राजकुमार पिल्लोळे**

लोहा तालुक्यातील शेवडी (बा.) येथील युवक बसवराज अप्पाराव आरळे वय ३७ वर्ष यांचे दि.१६ रोजी अल्प आजारांनी निधन झाले.



त्यांच्या अकाली निधनाने शेवडी (बा.) परिसरात हळहळ व्यक्त होत आहे.बसवराज आरळे हे मनमिळावू स्वभावाचे व सर्वांशी जिव्हाळ्याचे संबंध ठेवणारे म्हणून त्यांची ओळख होती. त्यांच्या निधनामुळे कुटुंबावर तसेच नातेवाईक व मित्रपरिवारावर शोककळा पसरली आहे.त्यांच्या पश्चात पत्नी, आई, एक मुलगा व एक मुलगी असा परिवार आहे.कै.बसवराज आरळे यांच्या पार्थिवावर दिनांक १७ फेब्रुवारी रोजी दुपारी १२:०० वाजता शेवडी (बा.) येथील वीरशैव-लिंगायत स्मशानभूमीत शोकाकुल वातावरणात अंत्यसंस्कार करण्यात आले.

# चनई ग्रामपंचायतीच्या वतीने बीड हायवे वर राजमाता जिजाऊंच्या पुतळ्याचे अनावरण

**अंबाजोगाई । प्रतिनिधी**

चनई ग्रामपंचायतीच्या वतीने बीड हायवेवर राजमाता जिजाऊ यांच्या भव्य पुतळ्याची प्रतिष्ठापना करण्यात आली.या ऐतिहासिक क्षणामुळे ग्रामस्थांमध्ये उत्साहाचे वातावरण निर्माण झाले असून, परिसरात देशभक्ती आणि प्रेरणेची भावना दाटून आली.या कार्यक्रमाला प्रमुख उपस्थिती म्हणून शिवमती राधाताई रामदास सपकाळ जिजाऊ ब्रिगेड जिल्हाध्यक्ष बीड या उपस्थित होत्या तसेच अनिल शिंदे चनई उपसरपंच,प्रभाकर सावरे,सरपंच पती प्रवीण कदम,ग्रामपंचायतसदस्य यांच्यासह गावातील मान्यवर उपस्थित होते.

यावेळी दत्ता भाऊ सावरे, गायकवाड मामा,विलास सावरे,विजय सावरे, निखिल कदम,बिरुदेव गोचडे तसेच इतर गावकरी मंडळी मोठ्या संख्येने उपस्थित होती. सर्वांच्या उपस्थितीत पुतळ्याचे पूजन व अभिवादन करण्यात आले.राजमाता जिजाऊं च्या कार्यातून प्रेरणा घेऊन समाजात आदर्श घडविण्याचा



संकल्प यावेळी व्यक्त करण्यात आला.कार्यक्रमाचे आयोजन ग्रामपंचायत चनई व ग्रामस्थांच्या सहकार्याने करण्यात आले.

# साळेगाव येथे १०१ शिव स्मारक यात्रेचे भव्य स्वागत

**दैनिक वादळ वार्ता**
**गौतम बचुटे । केज**

धर्मवीर छत्रपती संभाजी महाराज शौर्य प्रतिष्ठानचे बाळराजे आवारे पाटील यांचे १०१ शिव स्मारक यात्रेचे साळेगाव येथील गावकऱ्यांनी स्वागत केले.या बाबतची माहिती अशी की, धर्मवीर छत्रपती संभाजी महाराज शौर्य प्रतिष्ठानचे बाळराजे आवारे पाटील यांनी छत्रपती शिवाजी महाराज, छत्रपती संभाजी महाराज, भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर, महात्मा जोतिबा फुले, अण्णाभाऊ साठे, महात्मा बसवेश्वर या महापुरुषांच्या १०१ पुतळ्यांची शिव स्मारक यात्रे काढली आहे. कळंब, माळेगाव मार्गे ही यात्रा साळेगाव येथे आलेली असताना शिवप्रेमी आणि



आंबेडकर प्रेमी युवा कार्यकर्त्यांनी बाळराजे आवारे पाटील यांचा पुष्पहार घालून स्वागत केले तर रस्त्याच्या दुतर्फा जेसीबी मधून सर्व महापुरुषांच्या पुतळ्यावर पुष्पवृष्टी करून जोरदार घोषणाबाजी केली.

यावेळी सरपंच कैलास जाधव पाटील, उपसरपंच गणेश गालफाडे, मधुकर अंधारे, बाळासाहेब इंगळे, रोशन सरवदे, जय जोगदंड, लक्षण ओव्हाळ, अक्षय वरपे, अभिषेक लांडगे, सुमित नन्नवरे, रामेश्वर शिंदे, वैभव शिंदे, नवनाथ इंगळे, रितेश बचुटे, यश बचुटे, भागवत जाधव, समाधान इंगळे, गौतम बचुटे यांच्यासह अनेक नागरिक आणि स्मारक समितीचे कार्यकर्ते उपस्थित होते.

# साने गुरुजी निवासी विद्यालय हे केज तालुक्यातील उत्तम शिक्षण देणारे संकुल म्हणून नावलौकिक प्राप्त-प्रा.भोसले

**दैनिक वादळ वार्ता**
**केज । प्रतिनिधी**

साने गुरुजी निवासी माध्यमिक विद्यालय केज येथील इयत्ता दहावीच्या विद्यार्थ्यांना निरोप समारंभात मार्गदर्शन करताना प्रा.हनुमंत भोसले सर यांनी सांगितले की,आपले करिअर यशस्वी करण्या साठी आपल्याला एका चांगल्या मार्गदर्शकाची आवश्यकता असते. आजचा हा निरोप समारंभाचा कार्यक्रम हा मौज मजेचा नसुन आपल्या भविष्याचा विचार करण्याचा आहे. दहावी नंतर आपण आपल्या ख-या करिअर सुरवात करण्यासाठीचा आहे.विद्यार्थी मित्रानो तुमच्या कार्याने मोठे व्हा एका क्षेत्रात प्रगती करा प्रत्येक दिवस हा नवीन सुरुवात असते परिश्रम करणारा विद्यार्थी हा यशस्वी होतोच यासाठी विद्यार्थ्यांनी अभ्यासावर लक्ष केंद्रित केले पाहिजे नियोजित वेळापत्रक करुन अभ्यासाचा नियोजन करावे जगात आफाट अशा संधी असुन अचुक संधी शोधून संधीचा उपयोग कसा घेतो यावर अवलंबून



आहे.मानव सेवा हीच ईश्वर सेवा असुन जगात एकच ईश्वर आहे ते म्हणजे आपले आई आणि वडील आहे.त्यांची प्रेरणा घेऊन वाटचाल केल्यास आपण कुठेच कमी पडणार नाही आणि आई वडील आणि गुरुजींना आपल्या जीवनातील खरे मार्गदर्शक म्हणून मान दिले पाहिजे गुरु हा आपल्या शिष्यांचा कधीच वाईट होईल असे मार्गदर्शन करत नाहीत गुरुजनांना आपला विद्यार्थी नेहमीचयशाच्या शिखरावर असावा असे वाटते.साने गुरुजी निवासी विद्यालय केज च्या संकुलात चांगल्या प्रकारे गुणवत्ता पुर्वक शिक्षण दिले जाते या संकुलात इयत्ता दहावी व बारावीच्या शालांत प्रमाणपत्र परीक्षांचे केंद्र असून या केंद्रात भयमुक्त वातावरणात परिक्षा पार पडतात याचा मला स्वतःला चांगला अनुभव आहे असे मार्गदर्शन पर मत व्यक्त केले या प्रसंगी व्यासपीठावर बीडजिल्हा ऊसतोड कामगारविकास मंडळ केजच्या संस्थेचे अध्यक्ष अँड.उद्धवराव कराड,उपाध्यक्ष श्री. राजेश कापसे व या संकुलाच्या प्राचार्या डॉ.कविता गित्ते कराड मॅडम व शिक्षक शिक्षकेतर कर्मचारी उपस्थित होते.

# केज तालुक्यातील युसुफवडगाव पोलिस ठाण्याच्या हद्दीत स्थानिक गुन्हे शाखेच्या पथकाने शेतातील अफू विरुद्ध कारवाई

## साडेपाच लाख रु किमतीचे साडेतेरा किलो अफूसह शेतकरी घेतला ताब्यात

**दैनिक वादळ वार्ता**
**गौतम बचुटे । केज**

केज तालुक्यातील युसुफवडव पोलिस ठाण्याच्या हद्दीत असलेल्या सातेफळ येथे स्थानिक गुन्हे शाखेच्या पथकाने धार टाकून एका शेतकऱ्याने कांद्याच्या पिकात लावलेल्या अफूचे झाडे जप्त केली आहेत. या कारवाईत स्थानिक गुन्हे शाखेने कांद्याच्या पिकात लावलेले साडेतेरा किलो ग्रॅम वजनाची आणि बाजारात साडेपाच लाख रु. किंमत असलेली अफू यासह शेतकऱ्याला ताब्यात घेतले आहे.या बाबतची माहिती अशी की, दि.१७ फेब्रुवारी रोजी जिल्हा पोलिस अधीक्षक नवनीत काँवत, अप्पर पोलिस अधीक्षक चेतना तिडके आणि सहाय्यक पोलीस अधीक्षक व्यंकट राम यांच्या आदेशाने स्थानिक गुन्हे शाखेचे पोलिस उपनिरीक्षक महेश विघ्ने, पोलिस नाईक दिलीप गित्ते, पोलिस नाईक भागवत शेलार महेश जोगदंड, दीपक खांडेकर, गणेश मरांडे यांच्यासह युसुफवडगाव पोलिस ठाण्याचे सहाय्यक पोलीस निरीक्षक मच्छिंद्रनाथ शेंडगे, पोलिस उपनिरीक्षक भिमराव मांजरे यांनी युसुफ वडगाव हद्दीत असलेल्या सातेफळ येथील घाडगे वस्ती जवळ असलेल्या बन्सी घाडगे यांच्या शेतात कांद्याच्या पिकात अफूची लागवड केल्याची गुप्त बातमीदारा मार्फत माहिती मिळाल्या वरून दुपारी ३:३० च्या सुमारास छापा मारला. त्यावेळी बन्सी महादेव घाडगे याने त्याच्या शेतातील कांद्याच्या पिकात लावलेले अफूची झाडे आढळून आली. स्थानिक गुन्हे शाखेच्या पथकाने, केज तहसीलचे नायब तहसीलदार अशोक भंडारे, महसूल मंडळ अधिकारी दयानंद मस्के, सहाय्यक कृषी अधिकारी गणेश पारखे, सहाय्यक कृषी अधिकारी सुदर्शन शेळके यांच्या समक्ष अफूची झाडे उपटून त्यांचे वजन केले असता त्याचे वजन साडेतेरा किलो ग्रॅम असल्याचे आढळून. त्याची बाजार किंमत साडेपाच



लाख रु. एवढी आहे. या कारवाईत स्थानिक गुन्हे शाखेने अफूची लागवड करणारा शेतकरी बन्सी महादेव घाडगे याला ताब्यात घेतले आहे. या प्रकरणी बन्सी महादेव घाडगे याच्या विरुद्ध युसुफवडगाव पोलिस ठाण्यात एनडीपीएस कायद्या नुसार युसुफवडगाव पोलीस ठाण्यात गुंगीकारक औषधी द्रव्य व मनोविकारावर परिणाम करणारे पदार्थ अधिनियम १८८५ चे कलम २० नुसार गुन्हा नोंद करण्यात आला आहे. स्थानिक गुन्हे शाखेने केलेल्या या कारवाईत स्थानिक गुन्हे शाखेचे पोलिस उपनिरीक्षक महेश विघ्ने, पोलिस नाईक दिलीप गित्ते, पोलिस नाईक भागवत शेलार, महेश जोगदंड, दीपक खांडेकर, गणेश मरांडे यांच्यासह युसुफवडगाव पोलिस ठाण्याचे सहाय्यक पोलीस निरीक्षक मच्छिंद्रनाथ शेंडगे, पोलिस उपनिरीक्षक भिमराव मांजरे, स्वप्नील शिनगारे, हनुमंत गायकवाड यांच्यासह नायब तहसीलदार अशोक भंडारे, महसूल मंडळ अधिकारी मस्के, सहाय्यक कृषी अधिकारी गणेश पारखे, सहाय्यक कृषी अधिकारी सुदर्शन शेळके हे उपस्थित होते.या प्रकरणी सहाय्यक पोलिस निरीक्षक मच्छिंद्रनाथ शेंडगे यांच्या मार्गदर्शनखाली पोलिस उपनिरीक्षक भिमराव मांजरे हे तपास करीत आहेत.अफू हे मसाल्यात वापरीत असलेल्या खसखस या पदार्थाचे झाड असून अनेक शेतकऱ्यांना याला बंदी आहे या बाबत माहिती नसल्याने एक मसाल्याचे पदार्थ म्हणून काही झाडे लावली असल्याची चर्चा नाही. तसेच खसखस खुले आम बाजारात विकली जात असल्याने शेतकऱ्यांना त्याचे गांभीर्य लक्षात येत नाही.

हे पत्रक मालक, मुद्रक, प्रकाशक, संपादक अजय महादेव भांगे यांनी निर्मिती प्रिंटिंग प्रेस, टाकळी रोड , धोंडीपुरा , जोशी नर्सिंग होमच्या समोर बीड ता.जि. बीड ४३११२२ येथे छापून दैनिक वादळवार्ता कार्यालय, महात्मा फुले नगर केज, पाण्याच्या टाकीजवळ केज ता. केज जि. बीड ४३११२३ (महाराष्ट्र) येथे प्रकाशित केले.मो.न.९४२२६६००७७

This newspaper is printed by owner, printer,publisher,editor Ajay Mahadev Bhange at nirmiti printing press, takli road, dhondipura in front Joshi nursing Home,Beed,tq.Beed,Dist.Beed 431122, Maharashtra and published at Dainik Vadalvarta office Mahatma Phule Nagar, near water tank kaij tq.kaij dist.Beed 431123(Maharashtra) mo.no.9422660077